दिवाणी किरकोळ अर्ज २७/२०१६

निशाणी १२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र १ ते ३ यांनी त्यांच्या विरुध्द दिनांक ०६.०६.२०१७ रोजी अर्ज एकतर्फा चालविण्यात यावा असा झालेला आदेश रदद होऊन मिळण्यासाठी केला आहे.

२. अर्जदाराने या अर्जास लेखी हरकत घेतली आहे.

३. सामनेवाला क्र १ ते ३ हे नोटीसची बजावणी होउनही गैरहजर राहिल्याने त्याचे विरुध्द दिनांक ०६.०६.२०१७ रोजी अर्ज एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश झाला आहे. सामनेवाला क्र १ व ३ यांच्या नोटीसची बजावणी सामनेवाली क्र २ वर झाली आहे. ती अशिक्षीत आहे. त्यामुळे ती नोटीसीबाबत सामनेवाला क्र २ व ३ यांना माहिती देउ शकली नाही. प्रकरणासंबंधीत कागदपत्रे सामनेवाला यांना दिनांक १८.०९.२०१७ रोजी घराची साफ सफाई करीत असताना आढळून आली. त्यामुळे प्रकरणात हजर होउन म्हणणे देण्यास विलंब झाला आहे असे सामनेवाला क्र १ ते ३ यांचे कथन आहे. सदरचे प्रकरण विशेष दिवाणी दावा क्र ५९/२०१४ मध्ये निशणी ५ चे अर्जावर दिनांक २१.०३.२०१६ रोजी पारीत झालेल्या तूर्तातुर्त मनाई आदेशाचा भंग केलयाबाबत आहे. मुळ अर्जाचा गुणदोषांवर निकाल होण्याकरीता सामनेवाला यांना हजर होऊन म्हणणे देण्याची संधी देणे योग्य होईल असे माझे मत आहे. परिणामी मी खालील आदेश करीत आहे.

आदेश

१. अर्ज नि.१२ प्रत्येकी खर्च रक्कम रुपये ५००/— आकारुन मंजूर केला आहे.

२. दिनांक ०६.०६.२०१७ रोजी सामनेवाला क्र १ ते ३ यांचे विरोधात अर्ज एकतर्फा चालविण्यात यावा असा झालेला आदेश रदद केला आहे व सामनेवाला क्र १ ते ३ यांना म्हणणे दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२०.११.२०१७

(आर. ए. सासने )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर
पंढरपूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original order

a) Name of the stenographer A.j.Sure

b) Court : C.J.S.D. Pandharpur

c) order signed by P. O. on : 20/11/2017

d) order uploaded on : 21/11/2017